व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय यांच्या अधिपत्याखालिल गट-क संवर्गातील (पूर्व व्यवसाय अभ्यासक्रम व बायफोकल) कर्मचाऱ्यांच्या प्रशिक्षण कार्यक्रमाकरीता प्रशासकीय मान्यता देणेबाबत...

**महाराष्ट्र शासन**
**कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग,**
**शासन निर्णय क्रमांक आयटीआय-२०२६/प्र.क्र. ७९/संगणक क्र. १७१५११८/व्यशि-३,**
**मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,**
**मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.**
**दिनांक : २४ जून, २०२६**

**संदर्भ :**

१) सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र. टिआरएन-२०२३/प्र.क्र.६६/२३/१२-अ, दि. २७.०९.२०२३
२) कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग, शासन निर्णय क्र. आयटीआय-२०२६/प्र.क्र.३९/संगणक क्र. १६०४९७२/व्यशि-३ दि. २७.३.२०२६
३) संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, मुंबई यांचे पत्र क्र: का. क्र. -१२/नियोजन-३/प्रशिक्षण/२०२६/१०८, दि. ४.५.२०२६

**प्रस्तावना :**

राज्य शासन सेवेत सर्व स्तरावर कार्यक्षमता वाढवून गतिमान प्रशासन होण्याकरीता राज्यातील कर्मचारीवृंद यांना प्रशिक्षण देण्याची आवश्यकता आहे. आर्थिक, सामाजिक व तांत्रिक बदलांमुळे निर्माण होणाऱ्या आव्हानांना सामोरे जाणे व प्रशासनामध्ये बदलासाठी आवश्यक असणारी लवचिकता साध्य करणे यासाठी सर्व स्तरावर प्रशिक्षण देणे गरजेचे आहे.

संदर्भ क्र. १ च्या शासन निर्णयान्वये राज्य प्रशिक्षण धोरण-२०११ नुसार यशदा, पुणे (शिखर संस्था) तसेच विभागीय व जिल्हा स्तरावर घोषित करण्यात आलेल्या प्रशिक्षण संस्थांचे निवासी प्रशिक्षण शुल्काचे दर सुधारित करण्यात आले आहेत.

संदर्भ क्र. २ अन्वये संचालनालयाच्या अधिपत्याखालिल पूर्व व्यावसायिक अभ्यासक्रम व बायफोकल कर्मचारी यांचे ७५ कर्मचाऱ्याचे १५ दिवसाचे प्रशिक्षणाकरीता व त्याकरीताच्या रु.२०,२५,०००/- च्या खर्चास सन २०२५-२६ या वित्तिय वर्षात मान्यता देण्यात आली होती. परंतु प्रशिक्षण कार्यक्रमाची रक्कम खर्च होवू न शकल्यामुळे सदर प्रशिक्षण कार्यक्रमास सन २०२६-२७ या वित्तिय वर्षात मान्यता देणेबाबत संचालनालयाने विनंती केली आहे. त्याअनुषंगाने सदर प्रशिक्षण कार्यक्रमास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती.

**शासन निर्णय :**

सन २०२६-२७ या वर्षाकरीता संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय यांच्या अधिपत्याखालिल प्रादेशिक कार्यालय नाशिक, छत्रपती संभाजी नगर, नागपूर, अमरावती, मुंबई व

पुणे येथील पूर्व व्यावसायिक अभ्यासक्रम व बायफोकल कर्मचारी ७५ कर्मचारी यांचे १५ दिवसाचे प्रशिक्षण आयोजित करण्यास पुढीलप्रमाणे मान्यता देण्यात येत आहे:-

| अ. क्र. | संवर्गाचे नाव | प्रशिक्षणाचे ठिकाण | व्यवसायाचे नाव | कर्मचाऱ्यांची संख्या | प्रति कर्मचारी प्रशिक्षण खर्च (प्रतिदिन) | प्रशिक्षण कालावधी | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | गट क तांत्रिक | AVNL (IOL) Ambernath | Instructor (Pre Vocational Course) Mechanical Technology | २५ | १८०० | १५ | ६,७५,००० |
| २ | | | Instructor (Pre Vocational Course) Electrical Technology | ५० | १८०० | १५ | १३,५०,००० |
| | | | | ७५ | | | २०,२५,००० |

सदर प्रशिक्षणास खालील अटी व शर्तीच्या अधिन राहून मान्यता देण्यात येत आहे.

१. या योजनेंतर्गत शासकीय तंत्र माध्यमिक शाळा/केंद्र येथील कर्मचारी व शिक्षकीय कर्मचाऱ्यास प्राधान्य देण्यात यावे.
२. प्रशिक्षण कार्यक्रमामध्ये संबंधित व्यवसाय अभ्यासक्रमाचे अद्यावत ज्ञान, आधुनिक दृकश्राव्य माध्यमांचा उपयोग, सूचनात्मक साहित्य, शिकविण्याच्या नविन पध्दती/ तंत्रज्ञान, मानसशास्त्रीय बाबी तसेच प्रशिक्षणार्थ्यांना हाताळण्याच्या पध्दती इत्यादीचा अंतर्भात करण्यात यावा.
३. अधिकाऱ्यांना देण्यात येणाऱ्या प्रशिक्षणामध्ये नेतृत्व विकास, प्रशासकीय व आर्थिक बाबी, विद्यार्थी हित, सुप्रशासन व व्यवस्थापकीय कौशल्य इत्यादी बाबीचा समावेश करण्यात यावा.
४. अधिकारी/ कर्मचारी यांना सुरक्षेचे प्रशिक्षण देऊन दुर्घटनाची संख्या कमी करणे.

५. अधिकारी/कर्मचारी यांना अद्यावत सयंत्रे आणि उपकरणे कार्यक्षमतेने हाताळण्यासाठी प्रशिक्षण देण्यात यावे.

६. नविन तंत्रज्ञानानुसार झालेल्या बदलानुसार निदेशकांसाठीच्या प्रशिक्षण कार्यक्रमामध्ये त्यांच्याशी संबंधित औदयोगिक आस्थापनेशी सुसंगत प्रशिक्षण देण्यात यावे.

७. प्रशिक्षण कार्यक्रमांच्या खर्चाची उपरोक्त नमूद संस्थानिहाय कमाल मर्यादा प्रति प्रशिक्षणार्थी, प्रति दिन असून यामध्ये शैक्षणिक साहित्य, तज्ञाचे मानधन, त्यांचा प्रवास व राहण्याचा खर्च, तसेच जागेचे भाडे,स्टेशनरी, छपाई, आस्थापना भेटी व इतर सुविधांवरील खर्च इत्यादी सर्व खर्चाचा व भत्यांच्या खर्चाचा समावेश शासनाच्या प्रचलित नियमानुसार करण्यात यावा.

२. या प्रशिक्षण कार्यक्रमावर होणारा खर्च सन २०२६-२७ या आर्थिक वर्षात मागणी क्र. झेडए-२, २२०३-तंत्रशिक्षण, ००३, प्रशिक्षण (०१) शासकीय तंत्र माध्यमिक शाळा (०१)(०१) कर्मचारी वर्गाचे प्रशिक्षण (कार्यक्रम) (२२०३३४७१) लेखाशिर्षातर्गत १३, कार्यालयीन खर्च या उद्दिष्टामधून वित्त विभागाव्दारे उपलब्ध होणाऱ्या तरतूदीमधून प्रादेशिक कार्यालय यांना त्यांच्या विभागातील प्रशिक्षणाकरीता रु. २०,२५,००० (अक्षरी रक्कम रुपये वीस लाख पंचवीस हजार फक्त) खर्चास मान्यता देण्यात येत आहे. सदर रक्कमेस संचालनालयाच्या अधिपत्याखालील प्रादेशिक विभागातील प्रशिक्षणाकरीता खर्च करण्यास प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे. सदर खर्च बीम्स प्रणालीवर उपलब्ध होणाऱ्या तरतुदीमधून भागविण्यात यावा.

३. आहरण व संवितरण अधिकारी म्हणून लेखाधिकारी, प्रादेशिक कार्यालय, नाशिक, मुंबई, नागपूर, पुणे, छत्रपती संभाजी नगर व अमरावती यांना प्राधिकृत करण्यात येत आहे. सदर लेखाधिकारी यांनी योजनेसाठी उपलब्ध होणारा निधी खर्च करण्याची दक्षता खालील अटी व शर्तीच्या अधिन राहून घ्यावी.

३.१ संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, मुंबई यांनी प्रशिक्षणाबाबतच्या खर्चाचे उपयोगिता प्रमाणपत्र शासनास विहीत कालावधीत सादर करावे.

३.२ सामान्य प्रशासन विभाग तसेच वित्त व नियोजन विभाग यांनी यासंदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेले आदेश, सूचना, परिपत्रके, अटी व शर्तीचे कोटेकोरपणे पालन करावे.

४. शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थामधील कर्मचाऱ्यांच्या प्रशिक्षणासाठी येणाऱ्या खर्चास वित्त विभागाच्या वित्तिय अधिकार नियम पुस्तिका, १९७८ भाग- पहिला, उप विभाग-चार, खर्चाच्या संकीर्ण बाबी संबंधी प्रदान करण्यात आलेले वित्तीय अधिकार यामधील अ.क्र. १० अन्वये भारतातील प्रशिक्षण फी वरील खर्च मंजूर करण्यास प्रशासनिक विभागास प्रदान केलेल्या वित्तिय अधिकारान्वये मंजूरी देण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०६२४१२२२५७५४०३ असा आहे. हा निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

BHAROSE MUNJA UMARAO

Digitally signed by BHAROSE MUNJA UMARAO
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=SEEID, 2.5.4.20=F3ABF3AB8B16DFEC487F18CE64D6B0AB8E38D8925D44D15F7DBD61BABB4AE6DF, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=8B015B0D7AFAA0DB7C0603C5C954E6816492DBB5F94AB286DA7F224853A4EEBF, cn=BHAROSE MUNJA UMARAO
Date: 2026.06.24 12:26:06 +05'30'

**( मुं.उ. भरोसे )**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. अपर मुख्य सचिव, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग, मंत्रालय, मुंबई
२. विशेष कार्य अधिकारी, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग, मंत्रालय, मुंबई
३. कक्ष अधिकारी, व्यशि-१, कौशल्य , रोजगार, उदयोजकता व नाविन्यता विभाग, मंत्रालय, मुंबई
४. संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
५. सहसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालय मुंबई/पुणे/नाशिक/ छत्रपती संभाजीनगर/अमरावती/नागपूर,
६. सह/उप संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, संचालनालय,मुंबई
७. जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी, जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण कार्यालय (संचालनालयामार्फत)
८. निवड नस्ती, व्यशि-३